173

# कमला कॉलेजचे श्रमसंस्कार शिबिर धबधबेवाडीत सुरू

पन्हाळा / प्रतिनिधी ■

कमला कॉलेज (कोल्हापूर) यांच्या वतीने धबधबेवाडी (ता. पन्हाळा) येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत २० ते २९ नोव्हेंबर श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराचे उद्घाटन सरपंच पांडुरंग खोपकर यांच्या हस्ते झाले. या दरम्यान श्रमदान, स्वच्छता आणि आरोग्य शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन जलसंवर्धन, एडस् जनजागृती, बचतगट उपक्रम, आर्थिक आणि सामाजिक सर्वेक्षण, पथनाट्यातून समाजप्रबोधन करण्यात येणार आहे.

कोल्हापूर जिल्हा अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सचिव अनिल चव्हाण यांचे प्रात्यक्षिकासह व्याख्यान झाले. स्त्रियांचे आरोग्य आणि आहारविषयी प्रा. रेखा पंडित, आजची शिक्षण व्यवस्था या प्रा. निता धुमाळ यांची व्याख्याने झाली. तर कमलाच्या शिबिरार्थी मुलींनी प्रबोधनात्मक पथनाट्य सादर केले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य क्रांतीकुमार पाटील, प्रा. एन. एस. शिरोळकर, प्रा. अनिल घस्ते, प्रा. डॉ. भारती शेळके, प्रा. सुखदेव भोळे यांच्यासह उपसरपंच भिमराव पाटील, पुंडलिक खोपकर, सुलाबाई खोपकर, भिकाजी गोळे आणि ग्रामस्थ कार्यरत आहेत.

तरुणभारत 25-12-03

दै. तरुण भारत 27-12-03

# पन्हाळा शहरात स्वच्छता मोहीम

पन्हाळा/प्रतिनिधी■

कमला कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थिनींनी पन्हाळा शहरात पोलिस ठाणे, हैदर मशिद, कुमार विद्या मंदिर, संभाजी महाराज देवालय परिसरासह मयूर उद्यानात विशेष स्वच्छता मोहीम राबवली.

या मोहिमेत या विद्यार्थिनींसह नगराध्यक्ष विजय पाटील, नगरसेवक मधुकर भोपळे, नगरसेविका सौ. स्वाती हावळ, सौ. रेखा गोसावी, सौ. सुमन मारमल, सौ. सुनिता गवळी यांच्यासह ज्येष्ठ नागरिक संघाचे जी. डी. पाटील, अनंत हावळ, बशीर मुल्ला, आदम गारदी, रामचंद्र जगताप, कादर मुल्ला हे सहभागी झाले होते. जी. डी. पाटील यांनी पन्हाळ्याविषयी माहिती दिली तर अल्ताफ मोकाशी यांनी या स्वच्छता मोहिमेबद्दल अभिनंदन केले. प्रकल्प अधिकारी प्रा. अनिल घस्ते आणि प्रा. एन. एस. शिरोळकर श्री. बेटक्याळे यांनी संयोजन केले.

27-12-03